ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

# संयुक्त राष्ट्रे आणि भारताची भुमिका

*** प्रा. सविता शंकर वीर,**

* राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी, भोसरी, पुणे ४११०३९.

**प्रस्तावना :**

पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना इसवी सन 1920 मध्ये करण्यात आली. या संघटनेच्या स्थापनेपासून दहा ते बारा वर्ष जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले, परंतु या कालखंडात जर्मनी जपान व इटली या देशातील हुकूमशाहींनी जागतिक शांतता कार्यात बाधा आणल्याने राष्ट्रसंघाला पुढील कालखंडात चिरकाल जागतिक शांतता प्रस्थापित करता आली नाही. त्यामुळे जगाला दुसऱ्या महायुद्धाला सामोरे जावे लागले. या युद्धातील प्रचंड जीवित वित्तहानीमुळे मानवाचा आपल्या जीवनावरील विश्वास उडाला या युद्धाच्या भयानकतेचे चटके युद्धातील सर्व राष्ट्रांना बसले. या युद्धात विजयी आणि पराभूत राष्ट्रांचीही अर्थव्यवस्था कोडमडली. त्यामुळे राष्ट्रसंघाच्या अपयशाची यावेळी मीमांसा करण्यात येऊन, नवीन निर्माण करावयाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेत दोष राहणार नाहीत अशा आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.

**C opyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना :**

दुसरा महायुद्धाच्या काळात दोस्त राष्ट्रांनी जो विचार विनिमय आणि चर्चा केल्यानंतर त्याची परिमिती संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेत झाली. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट, इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी 14 ऑक्टोबर 1941 रोजी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी अटलांटिक सनदेची घोषणा केली. या सनदे मध्ये जनतेच्या सुरक्षिततेसाठी एखादी कायमस्वरूपाची उपाययोजना करण्याचे धोरण ठरवण्यात आले. सन 1941 मध्ये अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड या राष्ट्रांनी अटलांटिक सनदेला मान्यता दिली. सन 1944 मध्ये वॉशिंग्टन येथील बैठकीत संयुक्त राष्ट्र संघटनेचा कच्चा मसुदा तयार करण्यात आला. 25 एप्रिल 1945 रोजी अमेरिकेतील सॅन फ्रान्सिको येथे एकाहून राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे बैठक भरली होती. या बैठकीमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना निश्चित करण्यात येऊन 26 जून 1945 रोजी या संघटनेचा स्वीकार

करण्यात आला. 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद जाहीर केल्याने हा दिवस संयुक्त राष्ट्र संघटनेचा स्थापना दिवस म्हणला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्य कार्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे स्थापन करण्यात आले.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्टे :**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेची एकूण 111 कलम असून 19 प्रकरणे आहेत. या कलमात या संघटनेची रचना व कार्यपद्धती यांची सविस्तर चर्चा केलेली आहे या संघटनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन करणे.

२. समान हक्क व स्वयं निर्णय या तत्त्वांचा स्वीकार केलेल्या राष्ट्रात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे व वाढविणे.

३. मानवाच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक प्रगतीसाठी आणि मानवी हितासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे.

४. जगात मूलभूत स्वातंत्र्य व मानवी हक्कांविषयी आदर वाढविणे तसेच ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रयत्नात सुसंवाद आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी एक केंद्र स्थापन करणे.

**संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व:**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेत ज्या 51 राष्ट्रांनी भाग घेतला होता ती सर्व राष्ट्र संघटनेची मूळ सदस्य राष्ट्रीय आहेत याशिवाय या संघटनेची उद्दिष्टे ज्या राष्ट्रांना मान्य आहेत त्या सर्व राष्ट्रांना संघटनेचे सभासद होता येते. एखादा देश स्वेच्छेने संघटनेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकतो. सध्या 193 सदस्य देश आहेत

**संयुक्त राष्ट्र संघ आणि भारत :-**

1942 साली स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थापक सदस्य देशांपैकी भारत एक आहे सन फ्रान्सिस को येथे 25 व 26 जून 1945 रोजी झालेल्या ऐतिहासिक परिषदेमध्ये भारत सहभागी झाला होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या धोरणांचे भारताने खंबीरपणे समर्थन केले. संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

**भारताची कायम सदस्यत्वाची दावेदारी आणि चीनची भूमिका:**

भारताच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कायमच्या सदस्यत्वाला चीनने (काही मोजके अपवाद वगळता) कायमच विरोध केला आहे. जेव्हा जेव्हा इतर देश भारताच्या बाजूने अनुकूल होते तेव्हा तेव्हा चीनने त्यांची व्हिटो ची पॉवर वापरून भारताचा सदस्यत्वाचा प्रस्ताव नाकारला किंवा प्रलंबित केला आहे किंवा प्रलंबित केला आहे.

**भारताची कायम सदस्यत्वाची दावेदारी आणि रशियाची भूमिका :**

भारताच्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कायमस्वरूपी सदस्यत्वाला रशियाचा पाठिंबा आहे. आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सुधारणांची गरज असल्याचे मान्य केले आहे. भारताची दावेदारी रशियाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

**संयुक्त राष्ट्रे आणि भारताची भूमिका :**

**शांतता राखणे:** भारत संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये सर्वात जास्त सैन्य योगदान देणाऱ्या देशांपैकी एक आहे. कोरियन युद्धापासून ते आफ्रिका आणि मध्यपूर्वेतील सध्याच्या संघर्षांपर्यंत भारताने अनेक शांतता मोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे.

**शाश्वत विकास**: भारत गरीबी आणि असमानता कमी करण्यासाठी तसेच शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या धोरणात्मक साहाय्याचा उपयोग करतो. जागतिक स्तरावर मान्य केलेल्या शाश्वत विकास ध्येयांना (SDGs) समर्थन देण्यावर भारताचा भर आहे.

**मानवाधिकारांचे संरक्षण:** संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यत्वामुळे भारताने मानवाधिकारांचे रक्षण करण्यासाठी आणि वसाहतवाद व वर्णभेद नष्ट करण्यासारख्या सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी भूमिका बजावली आहे.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य:** संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य म्हणून, भारत आंतरराष्ट्रीय विधी, सुरक्षा आणि सहकार्य वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**सुधारणांसाठी प्रयत्न:** भारत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा व्हाव्यात यासाठी प्रयत्नशील आहे, जेणेकरून विकसनशील देशांना प्रतिनिधित्व मिळेल.

**आंतरराष्ट्रीय मंचावर भूमिका:** भारत संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर आपले मत मांडतो आणि जागतिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी इतर देशांशी समन्वय साधतो.

**संदर्भ ग्रंथ :**

१. ***आधुनिक जगाचा इतिहास (इ.स 1500 ते इ.स 1950)***
*प्रा. डॉ. किशोर कुमार गव्हाणे, प्रा. डॉ. सुखदेव शिंदे*
*एज्युकेशनल पब्लिकेशन औरंगाबाद.*

२. ***आंतरराष्ट्रीय राजकारणातील पद्धतीची समीकरणे आणि संयुक्त राष्ट्राची भूमिका***
*डॉ. देवळाणकर शैलेंद्र ,प्रतिमा प्रकाशन*

३. ***भारत विषयक आंतरराष्ट्रीय संबंध***
*डॉ. यादव हर्षवर्धन प्रतिभाताई शंकर ,ई - साहित्य प्रतिष्ठान*

*Cite This Article:*
***प्रा. वीर स. शं.* (2025).** *संयुक्त राष्ट्रे आणि भारताची भूमिका.* **In Educreator Research Journal: Vol. XII (Issue VI)**, pp. 89–91. **Doi:** https://doi.org/10.5281/zenodo.18327333